# मकर राशीफ़ळ ( Makar Rashiphal )



मकर राशीफ़ळ ( Makar Rashiphal )
मकर- ही राशी चक्रातील १० वी राशी असून उत्तराषाढाचे २ रे, ३ रे, ४ थे चरण, श्रवन, धनिष्ठा चे १ ले व २ रे चरण ही नक्षत्रे या राशीत येतात. मकर राशी चर, प्रधान, उष्ण, नकारात्मक, पृथ्वी तत्व, स्त्री, कोरडी, थंड, चतुष्पाद, उद्विग्न, लघु उदीत राशी म्हणवली जाते.

या राशीचा स्वामी शनी आहे.

मेष मधे शनी नीच असतो पण शनीच्या राशीमधे मंगळ उच्च असतो. गुरु या राशीत नीच असतो. सूर्य व चंद्र या राशीत शत्रू घरी मानले जातात. शुक्र व बुध या राशीत स्थित असता मित्र घरी मानले जातात.

**1. शारिरिक आकृती-** राशीचा स्वामी शनी हे दर्शवतो की जातक दुर्बळ, बारकट शरीराचा असेल. हळू हळू त्यात सुधारणा होईल. शरीर फ़ारसे मांसल नसेल. परंतू वयाच्या १६ व्या वर्षानंतर लवकर उंची वाढेल व शरीराचा विकास होईल. चेहरा पातळ व गोलसर असेल, नाक लांब व काळे डोळे व काळे केस असतील. शनी व रवी केसांची वाढ दाखवतो. कमजोर शनी डोक्याचे पुढील भागातील केसांची कमी वाढ दाखवतो वा नंतर कमी होतील. बलवान शनी केसाळ व्यक्ती दाखवतो. त्याचे गुडघ्याची वाटी मधे खरचटल्याचा व्रण वा मसा होऊ शकतो.

2. विशेषता- मकर ही पृथ्वी राशी असल्याने जातक कमी खर्च करणारा, काटकसरी, समंजस, विचारी, व्यावहारिक, बुद्धिवान असेल. जातक परिश्रमी, उद्योगप्रिय, शांतपणे काम करणारा स्वभाव असेल. गणना करणारा, व्यापारी असू शकतो.

मकर ही चर राशि असल्याने कोणत्याही कार्यास जबाबदारीने आणि विश्वासाने तत्परता दाखवेल. जर त्याला एखादी गोष्ट लाभप्रद वाटली तर आपले आयुष्यात पूर्ण परिवर्तन करण्यात जराही कचरणार नाहीत. योजना व्यवस्थापन कौशल्य, सहिष्णूता, धैर्य व दृढ स्वभाव असेल. स्त्री राशी व शनी स्वामी असल्याने एकांतप्रिय प्रकृती व उपहासाने व्यथित होणारे असतात. ते इतरांच्या आशवासनावर आनंदी ही होणार नाहीत व आपले काम पुरे होईपर्यंत आशावादी ही राहणार नाहीत. जरी हे नम्र व सरळ वाटत नाहीत तरी मकर जातकास

धोका देणे सोपे नाही. तो कोणाशीही घाईमधे मित्रता करणार नाही, पुर्णपणे त्यास तपासून पाहील आणि मग कायमची मित्रता करेल.

मकर जातक ईमानदार, विश्वसनीय, धर्मिक, नि”स्वार्थी, सहयोगी असेल पण पीडीत असेल तर घमंडी, बेईमान, स्वार्थी, लालची कंजूस, अपराध करण्यास न संकोच करणारा असेल.

शुभ दृष्टी शनी जातक हे दर्शवतो की तो प्रयोजनपूर्ण व वेळेचा सदुपयोग करणारा असेल. क कमजोर शनी हे दाखवतो की जातक मंदबुद्धी व काम करण्यासाठी एखाद्याच्या आधाराची गरज भासेल. सामान्यपणे तो कोणतेही काम लगेच करत नाही व शेवटपर्यंत स्थगीत ठेवतो. दुसरेकडून प्रेरणा मिळाल्यावार कामास सुरुवात करतो. मंद शनी त्याला लवकर सफ़लता मिळू देत नाही. त्याला निराश म्हणणे योग्य होणार नाही कारण हा जातक पुन्ह पुन्हा प्रयत्न करत राहतो आणी शेवटी सफ़लता मिळवतो.

मकर जातक एखादे काम सुरु झाल्यावर मात्र पूर्ण केल्याशिवाय सोडत नाही.

सामान्यपणे शुक्र एखादी गोष्ट प्राप्त करण्याची ईच्छा दर्शवतो व मकर जातकाच्या ५ वे व १० वे स्थानाची स्वामी शुक्र आहे. त्यामुळे तो आनंददायक गोष्टी प्राप्त करण्यासाठी उत्सुक असेल. तो संगीत, नाटक, सिनेमा ई. चा शौकीन असेल. सट्टा खेळणारा असू शकतो अथवा मंत्र दीक्षा प्राप्त करण्याकरता योग्य गुरु शोधेल वा भेटेल व सफ़लता प्राप्त करण्यात भाग्यशाली ठरेल.

चंद्र ७ वे स्थानाचा स्वामी असल्याने तो सतत जोडीदार अथवा मित्र संगतीची इच्छा ठेवेल व सोबत नसेल तर त्यास वाईट वाटेल. जेव्हा ते कोणतेही कार्य, अभ्यास अथवा प्रवास करतील तेव्हा मित्रांना सोबत घेतील व त्यामुळे खुश व कार्यशील राहतील.

महान व्यक्ती निर्माण करण्याची मकर राशीची क्षमता आहे. दशम स्थानी शनी उच्च असेल तर राजकारणी व्यक्ती असू शकतो. तुळ राशीमधे काही उपनक्षत्रांमधे शनी असा प्रभाव प्राप्त करेल की ते कार्यशील, धुर्त, चतुर, कूटनीती कुशल व स्वार्थी असतील. बुध निवड्णूकीच्या आधी लोकांना आशवासने देतो आणि नंतर विसरुन जातो. पण अशा व्यक्तींच्या कुंडलीत शनी बुध शुभ संबंध देशहिताचे ठरेल. कारण ते देशासाठी नि:पक्षपाती कार्य करतील फ़क्त त्यांच्या धीम्या गतीने.

**3. कमजोरी-** मकर लग्न वा लग्नेश शनी अशुभ दृष्टीत असेल तर जातक स्वार्थी व अहंकारी असेल. निराश व भंगलेल्या हृदयाचा असेल. अधिक चिंतन मनन करुन मानसिक दबाव घेईल व त्याचा थकवा जाणवेल वा जे आरोग्यास अतिशय घातक ठरु शकते.

**4. धन व संपत्ती-** मकर जातक परंपरावादी असून कमजोरी, बाधा, चिंता यात न अडकण्याचा व सफ़लता मिळेपर्यंत काम करण्याचा प्रय्त्न करतील. त्यांची महत्वाकांक्षा त्यांना कष्ट उपसण्याकडे प्रवृत्त करते व नाव, प्रसिद्धी, सन्मान व धनवान होण्याची इच्छा असते. ते येणारी संधी न चुकवण्याचा प्रय्त्न करतील पण ते व्यापारांचे वा सुविधांचे एकीकरण करण्याचा उपद्याप करतात. १२ पैकी कोणत्याही राशीचा व्यापारी गुरुच्या दशेमधे विस्तार करेल, अनेक शाखा काढेल, तोच व्यापारी शनीच्या दशेमधे अथवा मकर मधे स्थित

ग्रहाच्या दशेमधे त्याचे एकत्रीकरण करेल. मकर जातकास निराशा घेरु शकते. सावधपने सर्व कागद पाहिल्यावर व पर्याप्त सुख प्राप्त केल्यावर स्थायी संपत्ती साठी विनियोग करतील.

ते उद्योगी असतात व हळूहळू संपत्ती गोळा करत राहतात. जास्त जबाबदारी घेत नाहीत व संधी पकडण्यास विलंब करतात आणि लाभापासून वंचित राहतात. पण पैसे उधळत नाहीत.

जर नोकरीत असतील तर मितव्ययी, खरे, विश्वासपात्र, सतर्क असतील. ते वित्त विभागात नोकरी करण्यास योग्य असतात. ते नेहमी भविष्याचा विचार करुन अकस्मिक खर्चा साठी योग्य बचत करतील.

**5. नोकरी व्यवसाय-** शनी लग्न व व्दितीय स्थानाचा स्वामी असल्याने सूर्याची दृष्टी असेल तर अर्थ, शासकिय सेवेमधे, नगरपालिका, स्थानिय परिषद, खनिज पदार्थ, मोठ्या संस्थांचा संस्थांचा व्यवस्थापक, ठोक व्यापार ई संबंधित नोकरी व्यवसाय करेल.

चंद्राची शुभ दृष्टी असेल तर घासलेट, जमीन, पशू, शेती, विहीर खणणे, तलाव, किल्ल्यांची दुरुस्ती ऑईल, खाण ई संबंधित नोकरी व्यवसाय करेल.

मंगळाची शुभ दृष्टी असल्यास धातुचे नक्षीकाम, मिस्त्री, इंजिनियर, सर्व्हेयर, सिमेंट व चामडे( शुक्र पण संबंधित हवा), शल्य चिकित्सक ( सुर्य पण संबंधित), वकील (गुरु पण संबंधित), वीट भट्टी ई संबंधित नोकरी व्यवसाय करतो.

बुधाची ची शुभ दृष्टी असल्यास इंजिनियर, गुप्त पोलीस, कादंबरीकार, विचारवंत, गणीत व भौतीक शिक्षक, शास्त्रीय उपकरणे, सी आय डी (मंगळ पण संबंधित), हस्तकला, ध्यान, योगी ई संबंधित नोकरी व्यवसाय करतो.

गुरुची ची शुभ दृष्टी असल्यास चिकित्सक, शास्त्रद्न्य, क्लब, सोसायटी, कंपनी व्यवस्थापक, धर्मिक दान परिषद, जमीन, खाणी, शिक्षण, वित्त, कायदा, मोठे ठेके ई संबंधित नोकरी व्यवसाय करु शकतो.

शुक्राची ची शुभ दृष्टी असल्यास जातकास केमिकल्स, खनीज, वस्तू, चामडे, हाडे, जन्म मृत्यू नोंदणी, सन्यासी, बाग, जमीन, कब्रस्थान, ई संबंधित नोकरी व्यवसाय करतात. पुरोहित वा बाबा ज्याची गुरु व शुक्र शुभ दृष्टी असेल तर विवाह जमवण्यामधे निपून असतात. पुरोहित वा बाबा ज्याची शनी व शुक्र शुभ दृष्टी असेल तर विवाह विच्छेद मधे निपून असतात.

**6. आरोग्य-** मकर लग्न वा लग्नेश शनी अशुभ दृष्टीत असेल तर जातक स्वार्थी व अहंकारी असेल. निराश व भंगलेल्या हृदयाचा असेल. अधिक चिंतन मनन करुन मानसिक दबाव घेईल व त्याचा थकवा जाणवेल वा जे आरोग्यास अतिशय घातक ठरु शकते.

मकर गुढगे वा टाच दर्शवतो. शनी हाडांचा विकास दर्शवतो. मकर दुष्काळ व महामारी दर्शवतो. हिस्टेरिया, संधीवात, गाठी, सर्दी शनीव्दारे दर्शित होते. हे मानसिक दबाव घेऊन व आतुन कुढत राहतील व त्याचा आरोग्यावर व पचन संस्थेवर परिणाम होतो. क्वचित पोट फुगु शकते.

मकर कर्क राशीच्या विपरीत असल्याने फ़ुफ्फ़ुसासंबंधी त्रास होऊ शकतो. सिंह राशीपासून ६ वे असल्याने तो हृदयासंबंधी त्रास होऊ शकतो. उत्तराषाढा नक्षत्रामधे शनी असेल तर तो हृदयाच्या धडकण्यास प्रभावित करतो. उत्तराषाढा मधे मंगळ असेल तर तो हृदयाकडे जाणारे रक्त वाहिणीत गुठळ्या निर्माण करतो. राहू केतु असेल तर रक्तदाबाचा त्रास होतो.

श्रवण नक्षत्रामधे स्थित ग्रह फ़ुफ्फ़ुस, एक्झीमा ई वर प्रभाव ठेवतो. धनिष्ठामधे स्थित ग्रह उच्चताप, दमा, न्युमोनिया, पित्त, जखम, फ़्राक्चर, हाड सरकणे ई. दर्शवतो. मकर चर राशी असल्याने त्याचे ११ वे स्थान वश्चिक बाधक स्थान असल्याने मंगळ दीर्घायू करता शुभ नाही.

२ रे व ७ वे स्थान मारक आहे. शनी लग्नेश असल्याने स्वभावत: आयुष्य कारक आहे व २ रे मारक स्थान कुंभ चा स्वामी आहे, त्यामुळे शनी जातकाच्या आयुष्यास घातक ठरेल. सप्तमेष चंद्र आहे, म्हणुन मंगळ, शनी व चंद्र पापग्रह आहेत व त्यांच्या दशा अंतर्दशेत मृत्यू चे कारक होतील. अष्टमेश सूर्य असल्याने त्रास देऊ शकतो व षष्ठेश बुध प्रकृतीला प्रभावित करतो व व्हिटामिन बी ची कमतरता, गैस्ट्रिक त्रास, सामान्य नाडी रोग, बुध दशे अंतर्दशे मधे होऊ शकतो.

**7. मित्र व परिवार-** सामान्यपणे मकर जातक कोणासही एकदम मित्र बनवत नाहीत. पण त्याला पुष्कळ व्यक्ती ओळखतात. अनेक परिचित असले तरी ही चांगले मित्र फ़ार कमी असतील व तो आपल्या मित्रांसाठी सच्चा असेल व कायम साथ देतील. बुद्धिमत्तापूर्ण गोष्टींमुळे इतरांना प्रसन्न ठेवू इच्छितो व सोसायटी, क्लब सदस्य बनण्याकरता योग्य असतो. ज्यांचा जन्म मंगळ्वार वा वृस्चिक राशीमधे वा मृग, चित्रा वा धनिष्ठा, भरणी, पूर्वाफ़ाल्गुनी, पूर्वाषाढा नक्षत्रामधे झाला असेल, ते हितैषी आहेत व ते त्याला मदत करण्यास मागेपुढे पहात नाहीत व न सांगता मदतीस येतील.

११ वे स्थानाचा व ४ थे स्थानाचा स्वामी मंगळ असल्याने त्याचा आईकडे ओढा असतो व आईकडून लाभ प्राप्त करतो. पोटभाडेकरु सहयोग देतील, मकर जातकाचे मित्र विस्तृत विचारधारेचे वा धनवान असू शकतात.

सामान्यपणे मकर स्त्री जातक विवाहास उत्सुक नसते, परंतू तिचे लग्न लवकर जमते, तिला विवाह करावा लागतो. तिला जास्त मुले आवडत नाहीत. पण जरी मकर जातकास मुले जास्त असली तरी कर्तव्यामधे कधि कसूर करत नाहीत. ते आपल्या मुलांवर व जोडीदारावर प्रेमाचा अतिरेक करत नाहीत व त्यागही करत नाहीत. त्यामुळे त्यांचा गैरसमज होऊ शकतो की आपल्यावर प्रेम करत नाहीत. हे सुंदर वस्तूंचा संग्रह करतात. वाचनाची आवड व पुस्तकांच्या संग्रहची आवड असते. त्यांना मारहाण ई आवडत नाही व शांतीपूर्ण एकांत वातावरण आवडते. जर दांपत्य भांडणारे असले तरी मकर जातक त्यावेळेपुरता घरातुन निघून जाईल. ते आपल्या पारिवारिक जीवनाचा मान सन्मान टिकवण्याची इच्छा ठेवतात, मग जोडीदार कितीही त्यात बाधा आणू देत.

**8. प्रेम-** मकर जातक जोडीदारावर प्रेम करतो पण ते व्यक्त करत नाही. नाही तो लडिवाळ वा नृत्य ई करुन जोडादारास खुश करण्याचा करेल. तो भाऊक होणार नाही. जोडीदाराच्या निकट असला तरी उत्सुक व उतावळा होणार नाही. वा पुढाकार घेणार नाही. तो २ ३ वेळा जोडीदाराची विचारपूस करुन

संमती मागेल व तरीही धिम्या गतीने सामोरे जाईल. या त्याच्या अवेळी संथ पणामुळे जोडीदार असमाधानी होऊ शकतो. जोडीदाराची निवड करण्यास देखील वेळ घेऊ शकतात.

**9. वैवाहिक-** २, ७, ११ स्थान विवाह दर्शवतो. यांचे स्वामी शनी, चंद्र व मंगळ आहेत. या मधील सर्वात बलवान ग्रह कोणता हे माहीत करा, जो जोडीदाराचे प्रकृती, स्मृती, विशेषता ई. दर्शवतो.

जर व्दितीयेश शनी बलवान व उत्तम प्रकारे स्थित असेल तर शनी दशा अंतर्दशेत विवाह होईल. जोडीदार फ़ार स्वार्थी पण कमी खर्चिक असेल. व जातकास देखील वायफ़ळ खर्च करु देणार नाही. परिश्रमी असून परिवाराची प्रथा वा परंपरा पुढे सांभाळेल.

जर सप्तमेश चंद्र बलवान व उत्तम प्रकारे स्थित असेल तर जोडीदार भित्रा व प्रकृतीने कमजोर असेल. वारंवार निवासस्थान बदलण्याची इच्छा ठेवेल. अस्थिर असेल तरीही जातक व परिवाराशी जिव्हाळा असेल. दयाळू, स्वामीभक्त, व्यव्स्थित घर सांभाळ्णारी, सुविधा पुरवणारी व पतीचे सहकार्य मागणारी असेल.

जर लाभेश मंगळ बलवान व उत्तम प्रकारे स्थित असेल तर अधुनिक व पुरुष स्वभाव वाला जोडीदार मिळेल. ती योग्य व विश्वसनीय पत्नी सिद्ध होईल. परिवारास उत्तम प्रकारे सांभाळेल. कष्टाळू, सुग्रण, आदरातिथ्य करणारी असेल. ती मकर जातकास स्वतंत्रता देणार नाही. ती प्रत्येक गोश्टीचे मार्ग्दर्शन करेल. व कठोर शिस्तीचे असेल. सामान्यपणे पुष्कळ कमी वयामशे अकस्मात विवाह निश्चित होऊन विवाह होतो.

**10. संतती-** मकर जातकास पुष्कळ संतती असू शकते. तो त्यांचे वरचे प्रेम उघड व्यक्त करणार नाही. त्याचे कर्तव्य नीट पार पाडेल. खेळ कुद मधे कमी सहभाग घेईल. मुलांना शांत बसवीन आपले काम करणे पसंत करेल. तो आपल्या मुलांना एका चौकटीच्या बाहेर जाऊ देणार नाही व नियंत्रणामधे ठेवेल. ते तरी बाहेरुन प्रेमळ वाटले नाही तरी जसजशी मुले मोठी होत जातील, तसे त्यांना हे कळेल की वडील आतुन आपल्यावर प्रेम करतात व आपल्या हितालाच प्राधान्य देतात व आपल्याला सुख सुविधा देण्यासाठी अपार कष्ट घेतात.

**11. भाग्य दिवस-** तो आपल्या मुलांना एका चौकटीच्या बाहेर जाऊ देणार नाही व नियंत्रणामधे ठेवेल. ते तरी बाहेरुन प्रेमळ वाटले नाही तरी जसजशी मुले मोठी होत जातील, तसे त्यांना हे कळेल की वडील आतुन आपल्यावर प्रेम करतात व आपल्या हितालाच प्राधान्य देतात व आपल्याला सुख सुविधा देण्यासाठी अपार कष्ट घेतात.

शुक्रवार, मंगळ्वार शनिवार सर्वोत्तम आहेत. बुधवार सफ़लता देतो. प्रतीस्पर्धी वर विजय मिळ्वण्यास व दीर्घयात्रा करण्यास चांगला. गुरुवार रविवार खर्चिक आहेत. सोमवारॊ शत्रूता व कोर्ट कचेरी मागे लावतो. मंगळ्वार, शुक्रवार करार करण्यास चांगला. शनिवारी पैसे गुंतवण्यास चांगला. रविवारी व सोमवारी प्रवास टाळा. मंगळ्वारी, शुक्रवारी देव देवतांची प्रार्थना करा.

**12. भाग्य रंग-** पांढरा, नीळा, लाल शुभ रंग आहेत.

**13. भाग्य रत्न-** हिरा, नीलम, माणिक

**14. भाग्यशाली अंक-** ६, ८, ९ शुभ अंक ३ अशुभ आहे

-ज्योतिषमित्रमिलिंद (७०५८११५९४७) Whatsapp only

For More info : Visit : jyotishmitramilnd.in